**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, परभणी भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com**

**लातूर कृषी हवामान सल्ला** **मंगळवार दिनांक – ०५.११.२०१९**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक ६ ते १० नोव्हेंबर, २०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०६/११ | ०७/११ | ०८/११ | ०९/११ | १०/११ |
| पाऊस (मिमी) | ००.० | ०४.० | ०७.० | ००.० | ००.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३२.० | ३१.० | ३१.० | ३१.० | ३०.० |
| किमान तापमान (अं.से.) | २०.० | २०.० | २०.० | १९.० | १९.० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | ढगाळ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ८३ | ८८ | ८१ | ७८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७५ | ७५ | ७६ | ७८ | ७० |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ०४ | ०९ | ०४ | ०७ | ०६ |
| वा-याची दिशा | आग्नेय | दक्षिण | वायव्य | आग्नेय | आग्नेय |

| | | |
|---|---|---|
| हवामानाचा इशारा | जिल्ह्यात दिनांक ०७ ते ०८ नोव्हेंबर २०१९ रोजी तुरळक ठिकाणी अतिशय हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक ०५ नोव्हेंबर २०१९, जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता. | |
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| कापूस | वेचणी अवस्था | पावसात भिजलेला कापूस वाळल्यानंतर वेचणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. कापूस पिकावरील मर रोगाच्या व्यवस्थापनासाठी जमिनीवर साचलेले पाणी चर काढून त्वरित शेताबाहेर काढून टाकावे. |
| तुर | कळी लागणे अवस्था | तुर पिकात साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. तुर पिकावर अळयांचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ टक्के २० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४.४ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाचा अंदाज लक्षात घेऊन फवारणी करावी. |
| करवई | पेरणी अवस्था | जमिनीत वापसा येताच बागायती करडई पिकाची पेरणी करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास ३ ग्रॅम थायरम किंवा बावीस्टीन प्रती किलो बियाण्यास बिजप्रक्रीया करावी. |
| द्राक्ष | वाढीची अवस्था | द्राक्ष बागेत साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. बागेत पाने पिवळी पडत असल्यास बागेमध्ये युरीया १.५ ते २ ग्रॅम + झिंक सल्फेट ०.५० ते ०.७५ ग्रॅम प्रती लिटर पाणी याप्रमाणे पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. या फवारणीनंतर लगेचच फेरससल्फेट २ ते २.५ ग्रॅम + मॅग्नेशिअम सल्फेट १.५ ते २ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. |
| केळी | वाढीची अवस्था | पाऊस झालेल्या ठिकाणी केळी बागेत साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. केळी बागेत सिगाटोका रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रोपीकोनॅझोल १० मिली + स्टिकर १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| सिताफळ | वाढीची अवस्था | सिताफळ बागेत साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. परीपक्व झालेल्या व काढणीस तयार असलेल्या फळांची काढणी करून प्रतवारी करून बाजारपेठेत विक्रीस पाठवावी. |
| फुल शेती | काढणी / वाढीची अवस्था | फुलपिकात साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. काढणीस तयार असलेल्या फुलांची काढणी करून घ्यावी. |
| भाजीपाला | काढणी / वाढीची अवस्था | भाजीपाला पिकात साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकांची काढणी करून घ्यावी. |
| पशुधन व्यवस्थापन | -- | गोचीड व गोचीडामार्फत प्रसारीत होणारा थायलेरीओसीस हा आजार गोवर्गीय पशु विशेषत: संकरीत पशु यामध्ये आढळून येत आहे. यामध्ये शरीराचे तापमान वाढ, गळया भोवतालच्या जबडया खालील लिंम्फग्रंथींची सुज ही लक्षणे दिसतात अशा पशुधनास तात्काळ लिंम्फग्रंथीची काचपट्टी अथवा रक्तकाचपट्टीची तपासणी करून योग्य तो औषधोपचार करून घ्यावा. |

**सदर कृषी सल्ला पत्रिका डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.**